# Daily Regimen चे औषधे व 99 DOTS Checklist

***कॅट 1 व कॅट 2 च्या टि.बी. रुग्णांना औषध सुरु करताना खालील महत्वाचे मुद्दे सांगावे :-***

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | दररोज, न चुकता औषध घेणे | ✓ | 1 जर आपण आपला औषधाचा डोस वारंवार चुकवला तर आपणास भविषयात हया औषधांना दाद न देणारा क्षयरोग होण्याची संभावना आहे. |
| 2. | औषधाचा कालावधी | ✓ | 2 उपचारांचा कालावधीः- 6 महिने (कॅट-1) व 8 महिने (कॅट-2). कॅट -2 च्या रुग्णाला सांगणे कि पहिले 2 महिने दररोज इंजेक्शन (स्ट्रेप्टोमायसीन) घेणे आवश्यक आहे. |
| 3. | दररोज घ्याव्या लागणा-या गोळयांची संख्या | ✓ | 3 ओषधाचा डोस तुमच्या वजनावर आधारित आहे. तुम्हाला रोज 2किंवा 3 किंवा 4 किंवा 5 गोळया घ्यायच्या आहेत. |
| 4. | 99 डॉट्स दररोज कॉल करणे | ✓ | 4 **<u>औषध घेतल्यावर तुम्ही रोज न चूकता टोल फ्री नंबरवर फोन करायचा आहे.</u>** जर तुम्ही फोन करायला विसरलात तर तुम्हाला आठवण करून देण्यासाठी एस.एम.एस पाठवला जाईल. तसेच आरोग्य कर्मचारी, HV/STS/DTO ना संबंधीत मॅसेज जाईल. आम्ही आपणास कॉल किंवा भेट देऊ व आपल्याला येणा-या समस्यांचे निरसन करू. |
| 5. | पेशंटचे फोन नंबर | ✓ | 5 तुम्ही ज्या नंबरवरुन फोन करणार तोच नंबर दया. रुग्णाला त्यांच्या जवळच्या घरातील व्यक्तीचे, शेजारी, नातेवाईक यांचे दुरध्वनी क्रमांक/संपर्क क्रमांक उपचारासाठी देणे आवश्यक आहे. आपण आम्हांस असे 4 टेलीफोन नं. देऊ शकता. |
| 6. | 99 डॉट्स एन्वलोप | ✓ | 6 पाकिटावर दाखविलयाप्रमाणेच गोळया घेणे. हा कॉल संपुर्णतः मोफत आहे. शुन्य बॅलेन्स असतानाही व भारतात कुठुनही कॉल करु शकता. नंबरच्या आधी 0 किंवा +91 लावू नये. फोन केल्यावर'थँक्यू ऐकू येईपर्यंत थांबावे. फोन आपोआप डिसकनेक्ट होईल. |
| 7. | 3 किंवा 5 गोळया | ✓ | 7. जर आपण 3 किंवा 5 गोळया घेत असाल, तर सद्य पाकिटचे शेवटच्या डोस करिता दुसरे पकिट लागेल, तर दुस-या पाकिटाच्या टोल फ्री नंबरवर कॉल करा. |
| 8. | परिवाराची साथ | ✓ | 8. आपण आपल्या कुटुंबियांसोबत चर्चा करुन त्यांच्या सहकार्याने आपला दररोज औषधोपचार न चुकता घ्यावा. |
| 9. | समतोल आहार | ✓ | 9. रुग्णांनी समतोल व प्रोटीनयुक्त आहार घ्यावा. |
| 10. | औषधांचे दुष्परिणाम | ✓ | 10. तुम्हास जर काही त्रास झाला जसे की उलटया, पोटदुखी, ताप, अंगावर खाज येणे, तर लवकरात लवकर डॉट्स सेंटरशी संपर्क साधावा. |
| 11. | फॉलोअपची तारीख | ✓ | 11. प्रत्येक 28 दिवसानंतर आरोग्य केंद्रात, तुमचे ओळखपत्र सोबत घेऊन वरील औषधे घेण्यासाठी ________दिवशी यावे. वापरलेली पाकिटे परत आणून देणे. |